www.rajdand.com
सातारा शनिवार
९. ३. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999
मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

# मुंबईची जागा सोडली पण कल्याण-ठाण्यासाठी शिंदे आग्रही

## अजित पवार गटाला एक अंकी जागा, तिकीट कापलेल्या खासदारांचंही ठरलं!

**नवी दिल्ली :** राज्यातील महायुतीच्या जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आली असून अजित पवार गटाला एक अंकी जागा मिळणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. तर एकनाथ शिंदे) यांच्या शिवसेनेला ११ ते १२ जागा मिळण्याची शक्यता आहे. शिंदेंच्या ज्या खासदारांना तिकिट मिळणार नाही त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्यात येणार असल्याचीही माहिती आहे. केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी महायुतीची जागावाटपाची चर्चा सुरू असून काही वेळात अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. अमित शाहांच्या मुंबई दौऱ्यावेळी यावर प्राथमिक चर्चा झाली होती.

सुरुवातीला एकनाथ शिंदे यांच्याकडून जागावाटपाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यामध्ये कल्याण आणि ठाण्यासाठी ते आग्रही होते. ठाण्याच्या जागेवर भाजपने दावा केला होता. त्याचवेळी एकनाथ शिंदे यांच्या वाट्याची मुंबईतील जागा त्यांनी



### शिवसेना मुंबईची जागा भाजपला सोडणार

**मुंबईत भाजपकडून जास्तीत जास्त जागा लढवण्यात येणार आहेत. त्यासाठी शिंदे गटाने मुंबईतील एक जागा भाजपला सोडण्याची तयारी ठेवल्याची माहिती आहे. त्याचवेळी ठाणे आणि कल्याणची जागा आपल्याकडेच राहावी यासाठी शिंदे गट आग्रही असल्याची माहिती आहे.**

भाजपला सोडण्याची तयारी दर्शवली.

तिकीट कापलेल्या खासदारांचे पुनर्वसन होणार

शिवसेना शिंदे गटाच्या ज्या खासदारांचे तिकिट कापलं जाणार आहे त्या खासदारांचे वेगळ्या माध्यमातून राजकीय पुनर्वसन करण्यात येणार असल्याचं या बैठकीत ठरल्याची माहिती आहे.

### अजित पवारांना एक अंकी जागा


**त्यानंतर अजित पवारांनी अमित शाह यांच्यासमोर जागावाटपाचा प्रस्ताव सादर केला. सुरुवातीला शिंदे गटाला जितक्या जागा दिल्या जातात तितक्याच आम्हाला मिळाव्यात अशी मागणी त्यांनी केली होती. पण आता अजित पवारांना एक अंकी जागा मिळणार हे नक्की झालं आहे.**

या खासदारांना विधानपरिषद किंवा विधानसभेवर संधी दिली जाणार आहे.

राज्यातील महायुतीच्या जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी अमित शाहंनी पुढाकार घेतला असून त्यातून मार्गही निघाल्याची माहिती आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भाजप सर्वाधिक जागा लढवणार असून त्यानंतर शिवसेना एकनाथ शिंदे आणि त्या खालोखाल जागा या अजित पवार गटासाठी सोडण्यात येणार आहेत.

कमी जागा मिळालेल्या शिंदे गटाला आणि अजित पवार गटाला विधानसभेच्या वेळी जास्त जागा देण्याचं आश्वासन भाजपने दिल्याचं समजतंय.

# 'सीटीईटी'ची तारीख जाहीर, अर्ज प्रक्रियाही सुरू



**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (सीबीएसई) केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) घेण्यात येते. राष्ट्रीय स्तरावर ही परीक्षा घेतली जाते. त्यामुळे या परीक्षेची घोषणा सीबीएसईकडून कधी करण्यात येणार याकडे उमेदवारांचे लक्ष लागले होते. या परीक्षेची तारीख आणि नोंदणीचा तपशील जाहीर करण्यात आला आहे.

सीबीएसईने दिलेल्या माहितीनुसार देशभरात सीटीईटी ७ जुलैला घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठीची अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, २ एप्रिल ही अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (एनसीटीई) निर्णयानुसार पहिली ते आठवीच्या वर्गांना शिकवण्यासाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. केंद्रीय स्तरावर सीबीएसईकडून सीटीईटी आयोजित केली जाते. त्यानुसार ३ जुलैला होणारी सीटीईटी ही १९वी परीक्षा असून, देशभरातील १३६ शहरांमध्ये ही परीक्षा होणार आहे. उमेदवारांना परीक्षा देण्यासाठी २० भाषांचा पर्याय उपलब्ध असणार आहे. पेपर एक सकाळी साडेनऊ ते बारा, तर पेपर २ दुपारी साडेचार या वेळेत होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परीक्षा आणि नोंदणीबाबतची अधिक माहिती

https://ctet.nic.in या संकेतस्थळावर देण्यात आल्याचे सीबीएसईकडून स्पष्ट करण्यात आले.

# लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची पहिली यादी जाहीर

## राहुल गांधी 'या' जागेवरून निवडणूक लढवणार!

**दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीची कोणत्याही क्षणी घोषणा होऊ शकते. हीच शक्यता लक्षात घेऊन भाजपाने नुकतेच आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीमध्ये एकूण १९५ जागांसाठी उमेदवार जाहीर करण्यात आले. त्यानंतर आता काँग्रेसनेही आज (८ मार्च) आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केलीय. या यादीमध्ये एकूण ३९ उमेदवारांची नावे असून यात काँग्रेसचे खासदार राहुल गांधी, वरिष्ठ नेते शशी थरूर यांसारख्या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे.

राहुल गांधी कोणत्या मतदारसंघातून निवडणूक लढवणार?

काँग्रेसने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत एकूण ३९ नेत्यांचा समावेश आहेत. याच पहिल्या यादीत राहुल गांधी, शशी थरूर, भूपेश बघेल यांची नावे आहेत. राहुल गांधींना काँग्रेसने वायनाड या मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. २०१९ साली त्यांनी वायनाड आणि अमेठी या दोन



मतदारसंघांतून निवडणूक लढवली होती. यावेळी मात्र ते पुन्हा एकदा अमेठीतून निवडणूक लढवणार का? हा प्रश्न अद्याप कायम आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांना त्यांच्या तिरुअनंतपुरम या मतदारसंघातूनच उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांना काँग्रेसने सलग तिसऱ्यांदा याच मतदारसंघातून तिकीट दिले आहे.

डी के शिवकुमार यांच्या बंधूंना उमेदवारी

छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल हे पहिल्यांदाच लोकसभेची निवडणूक लढवणार आहेत. त्यांना काँग्रेसने छत्तीसगडच्या राजनंदगाव या मतदारसंघातून तिकीट दिले आहे. काँग्रेसच्या पहिल्या यादीत काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणूगोपाल यांचादेखील समावेश आहे. ते केरळमधील अलापुझ्झा या जागेवरून निवडणूक लढवतील. २००९ साली वेणूगोपाल यांनी याच जागेवर विजयी कामगिरी करून दाखवली होती. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांचे बंधू डी के सुरेश यांनादेखील काँग्रेसने पहिल्याच यादीत तिकीट दिले आहे. ते बंगळुरू ग्रामीण या मतदारसंघातून निवडणूक लढवतील.

## उसाचे थकीत १०० रूपये द्या, अन्यथा कारखान्यांची साखर अडवणार

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा कारखानदारांना इशारा

**कोल्हापूर :** येत्या चार दिवसात मागील गळीत हंगामातील थकीत १०० रूपये तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, अन्यथा कोणत्याही क्षणी साखर अडवण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शिरोळ व हातकणंगले तालुक्यातील साखर कारखान्यांना निवेदनावर देण्यात आला. तसेच एकाही सारखर कारखानदारांना लोकसभेच्या निवडणुकीत प्रचार करू देणार नसल्याचा इशारा यावेळी देण्यात आला. दत्त, गुरूदत्त, जवाहर, शरद व पंचगंगा साखर कारखान्यांना यावेळी निवेदन देण्यात आले.

मागील गळीत हंगामातील थकीत बिलापोटी ४०० रूपये द्या, या मागणीसाठी २३ नोव्हेंबर २०२३ रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पुणे बेंगलोर महामार्ग रोखला होता. मुख्यमंत्री एकनाथ



शिंदे व जिल्हाधिकारी राहूल रेखावर यांनी मध्यस्थी करून मागील गळीत हंगामातील १०० रूपये बिल देण्याचे आपल्या साखर कारखान्याने जाहीर केले होते. सदरची रक्कम दोन महिन्यात शेतकऱ्यांचे खात्यावर वर्ग करू साखर कारखान्यांनी लेखी आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही सदरचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले नाहीत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट बनलेली आहे. शेतकऱ्यांच्या घामाचे पैसे देण्यास आपल्या साखर कारखान्याने टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करू नये, ठरल्याप्रमाणे तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर बिले वर्ग करावीत.

अन्यथा निवडणुकीत आपल्याला तसेच आपल्या साखर कारखान्याच्या संचालक मंडळाला कोणत्याही गावात प्रचारासाठी आम्ही फिरू देणार नाही. तसेच साखर कारखान्यातून बाहेर पडणारी साखर अडवण्यात येईल. व यामधून मोठा संघर्ष निर्माण होईल, याची नोंद घेऊन शेतकऱ्यांची बिले देऊन सहकार्य करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी अण्णासो चौगुले, सावकर मादनाईक, वैभव कांबळे, राम शिंदे, सागर संभूशेटे, शैलेश आडके, सचिन शिंदे, राजाराम देसाई, आप्पा ऐडके, शिवाजी आंबेकर, शिवाजी पाटील, संपत पोवार, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अमित शाहांचा अडीच वर्षे मुख्यमंत्रिपदाचा शब्द

## संजय शिरसाठांच्या दाव्याने भाजपची डोकेदुखी वाढणार की शिंदे गटाचा हा भाजपला शह?



**मुंबई :** राज्याच्या राजकारणाचा जर बुद्धीबळाच्या दृष्टीने विचार केला तर सध्या कोण कोणाला शह काटशह देतायत असा प्रश्न पडलाय. एकीकडे भाजप आणि शिवसेना या जुन्या मित्रांचे संबंध कमालीचे विकोपाला गेलेत. मात्र आता भाजपचे नव्याने मित्र झालेले एकनाथ शिंदेही रोज एकेक प्यादी पुढे सरकवत भाजपला शह देत आहेत का असा प्रश्न पडतोय. कधी रामदास कदम, तर आता थेट संजय शिरसाट यांनीच भाजपला अडचणीत आणलंय.

सन २०१९ ची ठाकरेंच्या मातोश्री निवासस्थानी ठाकरे आणि शाहांची झालेली ती बैठक. भाजपची डोकेदुखी वाढवणारी बैठक पुन्हा वादाच्या केंद्रस्थानी आलीय. त्या बैठकीत आपल्याला मुख्यमंत्रीपदाचा शब्द अमित शाहांनी दिला, मात्र भाजपने तो पाळला नाही असा दावा उद्धव ठाकरेंनी वारंवार केलाय. खुद्द अमित शाहांनीही पुण्यातल्या सभेत उद्धव ठाकरेंचा दावा सपशेल फेटाळला होता.

निवडणूक निकालांनंतर शिवसेना भाजप युती तुटली आणि

### बंद दाराआडचं कवित्व पुन्हा सुरू

**बंद दाराआडच्या बैठकीचं पुन्हा राजकीय कवित्व सुरू झालं आहे. अडीच अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या पुन्हा चर्चा सुरू झाल्या. त्यामुळे शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाठ यांचं वक्तव्य हे भाजपची डोकेदुखी वाढवणार असल्याचं दिसतंय. तर काही जाणकारांच्या मते शिंदे गटाचा हा भाजपला शह असल्याचं म्हटलं जातयं.**

उद्धव ठाकरेंनी काँग्रेस राष्ट्रवादीची साथ घेत महाविकास आघाडी स्थापन केली. मात्र त्यानंतर पुलाखालून आता बरंच पाणी वाहून गेलंय. उद्धव ठाकरे सध्या मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. भाजपवर टीका करताना उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा त्या बैठकीचा मुद्दा उकरून काढलाय.

चहापाणीवेळी सहजपणे उद्धव ठाकरे अमित भाईंना म्हणाले, हम जरा अंदर बैठेंगे दो मिनिट. ते आत गेले आणि वीस मिनिटात चर्चा केली. आम्ही ज्या स्टेजवर म्हणालो आमचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यावेळी सगळे शिवसेनेचे नेते त्या स्टेजवर होते. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी केव्हाही ऑब्जेक्शन घेतलं नाही. जर ठरलेलं होतं तर त्याचवेळी ऑब्जेक्शन घ्यायचं होतं. पण माझ्याशिवाय सरकार बनत नाही असं चित्र यायला लागलं तेव्हा त्यांची भाषा बदलली माझे सगळे चैनल ओपन आहेत.

उद्धव ठाकरेंचे दावे सातत्याने फेटाळणाऱ्या भाजपसमोर आता पंचाईत निर्माण झालीय. शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी अडीच अडीच वर्षांचा मुख्यमंत्रीपदाचा फॉर्म्युला ठरला होता असं मोठं विधान करत खळबळ उडवून दिलीय.

संजय शिरसाट यांच्या वक्तव्याइतकंच टायमिंगलाही महत्त्व आहे. महायुतीचे नेते सगळं सुरळीत असल्याचे कितीही दावे करत असले तरी ते तसं नाही हे लांबलेलं जागावाटप दाखवून देतंय. त्यातच शिंदे गटाचेच ज्येष्ठ नेते रामदास कदम भाजपच्या इराद्यांवर टीका करू लागलेत. आता संजय शिरसाट यांनीही भाजपचे दावे खोडणारी भूमिका घेत नवा शह दिलाय. शिंदे गटातल्या नेत्यांची रोजची वक्तव्य भाजपची कोंडी करत आहेत.

विशेष म्हणजे आपल्याच नेत्यांच्या वक्तव्यांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मात्र मौन बाळगून आहेत. त्यामुळे अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्यासाठी शिंदे गटाचाच हा डाव नाही ना अशा चर्चांना उधाण आलंय

# आरेतील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय

## उच्च न्यायालयाचे निरीक्षण; तातडीने दुरुस्तीचे आदेश

**मुंबई :** आरे दुग्ध वसाहतीतील अंतर्गत रस्ते अत्यंत दयनीय स्थितीत आहेत, असे निरीक्षण नोंदवून त्याच्या दुरुस्ती आणि देखभालीची कामे तातडीने हाती घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. तसेच, सार्वजनिक हित लक्षात घेऊन आणि आचारसंहितेसारखी कारणे पुढे न करता त्यासंबंधीच्या प्रस्तावावर त्वरित प्रक्रिया करण्याचेही न्यायालयाने राज्य सरकारसह संबंधित यंत्रणांना बजावले आहे.

आरे वसाहतीतील ४५ किमी रस्त्यांच्या दयनीय स्थितीची दखल घेऊन त्यांच्या सर्वेक्षणासाठी आणि त्याच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीच्या शिफारशी सुचवण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन केली होती. या समितीने अहवाल सादर करून रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीबाबत शिफारशी केल्या होत्या. समितीने सादर केलेल्या अहवालात, ४५



किमी रस्त्यांपैकी ११.९८ किमीचा भाग आरक्षित वनक्षेत्रात मोडत असल्याचे आणि १९.१७ किमीचा रस्ता तातडीने दुरुस्ती करण्याची शिफारस केली होती. याशिवाय, ८.२२ किमीचा रस्ता बंद करण्याची शिफारस केली होती. समितीने सादर केलेल्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर झालेल्या सुनावणीच्या वेळी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने आरेतील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असल्याची टिप्पणी केली. तसेच, त्यांची दुरुस्ती व देखभालीची कामे तातडीने हाती घेण्याचे आदेश दिले.

समितीने शिफारस केलेला ८.२२ किमीचा रस्ता दहा दिवसांत त्वरित बंद करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. त्यावर, लोकसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर प्रस्ताव तातडीने मंजूर करून घेणे शक्य होणार नसल्याची बाब अतिरिक्त सरकारी वकील मिलिंद मोरे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. मात्र, आचारसंहितेची सबब सांगू नका, आचारसंहिता न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीच्या आड येऊ शकत नाही, असे सुनावले.

### मोदींच्या मतदारसंघातच 'या' काँग्रेस खासदाराचा भाजपात प्रवेश

**वाराणसी :** देशात आगामी निवडणुकांचे वारे वाहत असताना काँग्रेसमधून नेत्यांचे पक्षांतर सुरू आहे. पंतप्रधान मोदींच्या वाराणसी या मतदारसंघातच ज्येष्ठ काँग्रेस नेत्याने भाजपात प्रवेश केला आहे. वाराणसीचे माजी खासदार राजेश मिश्रा यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला काँग्रेस सोडण्याचा आणि भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाने येत्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. राजेश मिश्रा यांच्या भाजपाप्रवेशाने पूर्व उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेससाठी पोकळी निर्माण झाली आहे. दिल्लीतील पक्षाच्या मुख्यालयात राजेश मिश्रा यांनी अधिकृतपणे भाजपामध्येप्रवेश केला.

पाहिजेत

राजदंड

२५ वर्ष सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या दै राजदंडसाठी पश्चिम महाराष्ट्रात तालुका व जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहे. आपल्या परिसराची भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक जाण असलेल्या, मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांनी संपर्क साधावा. उमेदवार पदवीधर असावा. पत्रकारिता व जनसंपर्क विषयात प्रशिक्षण घेतलेल्या व माध्यम क्षेत्रात किमान अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

संपर्क: rajdand.pune@gmail.com

# सातारा शहराचा कायापालट करून दाखवणार

## आ. शिवेंद्रसिंहराजे; जुना आरटीओ चौक रस्ता, गणेश कॉलनी व अजिंक्य कॉलनी उद्यानाचे भूमिपूजन

**सातारा :** सत्ता असो वा नसो, सातारा शहरातील समस्या सोडवण्यासाठी आपण नेहमीच प्राधान्य दिले आहे. नागरिकांना अपेक्षित विकासकामे मार्गी लावण्यासाठी सातत्याने भरीव निधी उपलब्ध केला आहे. जो काम करतो त्याच्याच पाठीशी सातारकर उभे राहणार आहेत. सातारकरांच्या साथीने आगामी काळात सातारा शहराचा कायापालट करून दाखवणार, असा शब्द आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिला. '



**जुना आरटीओ चौक ते भू- विकास बँक रस्त्याच्या कॉँक्रिटीकरणाचे भूमिपूजन करताना आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि मान्यवर.**

आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीनुसार शहरातील प्रमुख चार रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण करण्यासाठी उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून ५० कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. पहिल्या टप्प्यातील २५ कोटी रुपये उपलब्ध झाले असून त्यापैकी ८ कोटी २५ लाख निधीतून जुना आरटीओ चौक ते भू- विकास बँक या रस्त्याचे कॉँक्रीटीकरण करणे तसेच आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या विशेष प्रयत्नातून सदरबझार येथील गणेश कॉलनी येथे उद्यान (१ कोटी निधी) आणि अजिंक्य कॉलनी येथे उद्यान (८० लाख निधी) ही कामे मंजूर झाली आहेत. या कामांचा शुभारंभ आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी अशोक मोने, विजय देसाई, अविनाश कदम, प्रदीप मोरे, सुनील जाधव, अनिल जगदाळे, किरण बाबर, डॉक्टर राजेश शिंदे, राहुल फाळके, डॉक्टर जयंत सरवटे, योगेंद्र शेरकर, रमण वेलणकर, सुनील भंडारी, शैलेश जगताप, महेश देशमुख, निवास साबळे, प्रसाद साळुंखे, केतन दोशी, यशवंत पाटणे, अशोक साळुंखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले, जुना आरटीओ चौक ते भू- विकास बँक या रस्त्याची नेहमीच दयनीय अवस्था होत असते. त्यामुळे कॉँक्रीटीकरण हा कायमचा उपाय त्यावरत काढला आहे. ना. फडणवीस यांच्या माध्यमातून शहरातील रस्त्यांच्या कॉँक्रिटीकरणासाठी निधी मिळाला आहे. काम झाल्यांनतर वाहनचालकांची कायमची गैरसोय दूर होणार आहे. शहरासह हद्दवाढीत समाविष्ट भागाच्या सर्वांगीण विकासासाठी, सर्वप्रकारचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने निधी उपलब्ध करून ती- ती कामे मार्गी लावली आहेत. काम कोण करतंय हे सातारकर चांगलेच ओळखून आहेत. त्यामुळे सातारकर आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. सातत्यपूर्ण विकासकामे मार्गी लावून आगामी काळात साताऱ्याचा चेहरामोहरा बदलून दाखवू, असे ते म्हणाले.

याप्रसंगी दिलीप चव्हाण, सुभाष ओंबळे, मधुकर मोहिते, डी. जी. जाधव. साळुंखे सर, शकील सय्यद, शकील मुजावर, नितीन माने, संजय कदम, इंद्रजीत चव्हाण, संतोष फडतरे, संदीप माने, अन्सार आत्तार, दीपक शिंदे, सतीश मर्ढेकर, सतीश सूर्यवंशी, विकास शेंडे, श्रीकांत मोहिते, प्रीतम चव्हाण, प्रतीक मोहिते, आकाश जाधव, बाळासाहेब ठक्कर, चंद्रशेखर चोरगे, सुनील झंवर, अनिरुद्ध दोशी, हेमंत आपटे, किरण भोसले, स्वाती चव्हाण, स्मिता ओंबळे, सुरेखा मर्ढेकर, निखिल फडतरे, सुनील भांबळ, लालासो मोहिते, सुजित जगधने, निलेश साबळे, प्रभावती जोशी, राहुल मोहिते, रूपाली घोरपडे, रेखा गायकवाड, संभाजी धुमाळ, आबा शिंदे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## प्राथमिक शिक्षक बँकेच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने महिला दिन होणार साजरा

**सातारा :** प्राथमिक शिक्षकांना अडचणीला आर्थिक मदत व्हावी. या हेतूने प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची मुहूर्तमेढ रचली आहे. आज त्याचा वटवृक्ष झाला असून दिनांक ८ मार्च रोजी महिला दिनाच्या निमित्ताने प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या सर्व शाखेमध्ये ८ ते १६ मार्च या कालावधीमध्ये प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या सर्व शाखांमध्ये स्थानिक संचालक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने महिला दिन साजरा होत आहे. तसेच शताब्दी महोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. अशी माहिती सातारा जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचे चेअरमन किरण यादव व वाईस चेअरमन शिवाजी खाडे यांनी दिलेले आहे.

सातारा जिल्ह्यातील नावलौकिक प्राप्त केलेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची स्थापना २१ ऑक्टोबर १९२४ रोजी झालेली आहे १७ एप्रिल१९४८ रोजी संस्थेची विभागणी उत्तर व दक्षिण सातारा होऊन सातारा जिल्ह्यातील कराड व पाटण तालुका वगळता उर्वरित नऊ तालुक्यांमध्ये तेरा शाखांमधून प्राथमिक शिक्षक सहकारी बँक कार्यरत आहे.

सदर बँकेने यशस्वी मार्गक्रमण केलेले आहे. बँकेचे १० हजार २६८ ठेवी सभासद आहेत बँकेचे ठेवी ७०० कोटी असून ४४३ कोटी रुपये कर्ज वितरण केलेले आहे. बँकेचा एकत्रित व्यवसाय ११४ कोटी असून प्रति सेवक व्यवसाय ७ कोटी ४४ लाख इतका आहे.

बँकेमार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येतो तसेच सभासदांच्या हिताचाही निर्णय घेतला जातात .सभासदांना वाहन तारण, शैक्षणिक व घर बांधणी, आपत्ती निवारण ओ.डी. सोने तारण, अल्पमुदत व दीर्घ मुदत कर्ज देण्यात येत असते.

भविष्यात यू.पी.आय. ए.टी.एम. सुधारणा करण्याचा मानस प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचा आहे. प्राथमिक शिक्षण सहकारी बँकेमध्ये महिला सभासदांची संख्या ३५३१ एवढी असून २१ कार्यक्षम संचालकांपैकी दोन महिला संचालक आहेत. अशी ही माहिती चेअरमन यादव व्हाईस चेअरमन खाडे यांनी दिलेले आहे.

# हरिद्वार निवडणुकीचा हंगाम भाजपसाठी सोपा नाही, निवडणूक व्यवस्थापनाची खडतर परीक्षा

**हरिद्वार :** हरिद्वार लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक समीकरण इतर जागांच्या तुलनेत अधिक गुंतागुंतीचे आहे. भाजपला विजयी उमेदवार शोधण्यात अडचण येत आहे. हरिद्वार लोकसभा मतदारसंघातून सलग दोन वेळा खासदार राहिलेले डॉ. रमेश पोखरियाल निशंक यांच्याशिवाय इतर दावेदारांच्या नावांवरही पक्ष गांभीर्याने विचार करत आहे.

अर्थात भाजप राज्यातील लोकसभेच्या पाचही जागांवर विजयाचा दावा करत आहे, पण हरिद्वारचा निवडणुकीचा हंगाम त्यासाठी तितकासा सोपा मानला जात नाही. या लोकसभा मतदारसंघाची निवडणूक समीकरणे भाजप मानत आहेत तितकी साधी नाहीत. या जागेवर भाजपचे निवडणूक व्यवस्थापन जातीय समीकरणांच्या दृष्टीने कठीण आव्हानांमधून जाणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. या आव्हानांमुळे या जागेसाठी विजयी उमेदवार शोधण्यासाठी पक्षाला कसरत करावी लागत आहे. या जागेवर पक्षाची निवडणूक आणि बूथ मॅनेजमेंटचीही कसोटी आहे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या २३ विधानसभा जागांपैकी सात एकट्या हरिद्वार जिल्ह्यातील आहेत. यामध्ये भगवानपूर, झाब्रेडा, ज्वालापूर, हरिद्वार ग्रामीण आणि पिरान कालियार या जागा काँग्रेसकडे आहेत, मंगळुरू आणि लक्सर या जागा बसपाने तर खानापूर अपक्षांनी जिंकल्या आहेत.



### उमेदवार निवडीबाबत खूप विचार

**हरिद्वार जिल्ह्यात ११ पैकी केवळ तीन जागांवर भाजप आहे. तर २०१७ च्या निवडणुकीत भाजपने ११ पैकी ८ जागा जिंकल्या होत्या. म्हणजेच २०१९ च्या निवडणुकीत हरिद्वार जिल्ह्यात भाजप राजकीयदृष्ट्या मजबूत होता. मात्र आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने ती जिल्ह्यात राजकीयदृष्ट्या तेवढी ताकदवान नाही. त्यामुळेच या जागेसाठी उमेदवार निवडताना केंद्रीय नेतृत्वाला बराच विचार करावा लागत आहे.**

तज्ज्ञांच्या मते, हरिद्वार लोकसभा मतदारसंघातून सलग दोन वेळा खासदार राहिलेले डॉ. रमेश पोखरियाल निशंक यांच्याशिवाय इतर दावेदारांच्या नावांवरही पक्ष गांभीर्याने विचार करत आहे. माजी मुख्यमंत्री त्रिवेंद्र सिंह रावत, माजी कॅबिनेट मंत्री आणि आमदार मदन कौशिक, माजी कॅबिनेट मंत्री स्वामी यतीश्वरानंद यांच्याशिवाय दोन बडे संतही या जागेसाठी दावेदार असल्याचे बोलले जात आहे. परंतु, पक्षाला जातीय समीकरणांच्या आधारे विजयी चेहऱ्याच्या शोधात आहे.

### पराभवानंतर पक्ष निवडणूक व्यवस्थापनात गुंतला

**२०२२ च्या विधानसभा निवडणुकीत ११ पैकी पाच जागा गमावल्यानंतर, राज्य संघटना हरिद्वार जिल्ह्यातील निवडणूक व्यवस्थापनात गुंतली. पराभूत झालेल्या २३ विधानसभा जागांवर बूथ व्यवस्थापनाबाबत पक्षाने विशेष मोहीम राबवली. मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी आणि प्रदेशाध्यक्ष महेंद्र भट्ट हेही या गमावलेल्या जागांना भेटी देऊन लाभार्थी परिषदांच्या माध्यमातून पक्षाच्या बाजूने वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण पक्षाची निवडणूक आणि बूथ मॅनेजमेंटची खरी कसोटी लोकसभा निवडणुकीतच लागणार आहे. उदाहरणार्थ, भगवानपूर, मंगळूर, खानपूर, ज्वालापूर आणि हरिद्वार ग्रामीण भागातील ५३७ बूथवर भाजप पिछाडीवर आहे. हे बूथ मजबूत करण्यासाठी पक्षाने विशेष योजना आखली. त्यात आपले आमदार, खासदार आणि सरकारचे मंत्री पाठवले.**

## निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्रे बांधकाम कामगारांना गृहोपयोगी वस्तूंचे वाटप



**उत्तूर :** कोणतेही घटनात्मक पद नसतानाही केवळ जनतेच्या आशीर्वादाने कागल विधानसभा मतदारसंघाच्या शाश्वत विकासासाठी निधी खेचून आणत आहे.येत्या काळात मासेवाडी परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू. अशी ग्वाही शाहू ग्रुपचे अध्यक्ष व भाजपाचे नेते अध्यक्ष समरजित घाटगे यांनी दिली.

मासेवाडी . आजरा . येथे राजे समरजितसिंह घाटगे यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेल्या संजय गांधी निराधार योजनेतील पात्र लाभार्थ्यांना पेन्शनची मंजुरी पत्रे तसेच बांधकाम कामगारांना गृहोपयोगी वस्तूंचे वाटप अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते.

ग्रामस्थांच्या वतीने समरजीत घाटगे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी घाटगे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात निराधार योजनेतील लाभार्थी चंद्राबाई भाऊ पाटील,हौसाबाई नारायण चौगुले, गंगुबाई विठोबा सावंत, विठाबाई बापू सावर्डे, रत्नाबाई कृष्णा चौगुले यांना मंजुरी पत्रांचे वाटप करण्यात आले.

घाटगे पुढे म्हणाले, शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळवून देताना आपण गट-तट याचा यत्किंचितही विचार केला नाही. छत्रपती शाहू महाराजांच्या रक्ताचा वारस म्हणून आम्ही निर्हेतुकपणे समाजउभारणीचं काम आमच्या तमाम कार्यकर्त्यांच्या पाठबळावर करत आहोत .त्यामुळे येत्या काळात परिवर्तनाच्या लढाईत आपल्या सर्वांनी आम्हाला आशीर्वाद द्यावा असे आवाहनही .घाटगे यांनी यावेळी केले.

यावेळी सुदाम सावर्डे, तुकाराम सावर्डे ,वैभव गिरी ,रावसाहेब सावर्डे ,भास्कर पाटील, विजय परीट, सुनील यादव,सुरेश परीट यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते,लाभार्थी,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वागत प्रास्ताविक शशिकांत पाटील यांनी केले. आभार आनंदराव परीट यांनी मानले.

## सातारा जिल्ह्यात महाशिवरात्र मोठ्या थाटात आणि विविध धार्मिक उपक्रमांनी साजरी



**सातारा :** हर हर महादेव, जय शिवशंकराच्या जयघोषात सातारा जिल्ह्यातील विविध शंकरांच्या मंदिरात महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या धार्मिक आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला .सालाबाद प्रमाणे जिल्ह्यातील विविध शिवमंदिरामध्ये यानिमित्त रुद्राभिषेक,महा अभिषेक, पंचोपचार तसेच पूजा ,कीर्तन, प्रवचन ,अखंड हरिनाम ,महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

सातारा शहरातील ऐतिहासिक अशा शुक्रवार पेठेतील कोटेश्वर मंदिर, मंगळवार तळ्या नजीकचे गणकेश्वर व बहुलेश्वर मंदिर ,अमृतेश्वर मंदिर ,कृष्णेश्वर मंदिर ,यादव गोपाळ पेठेतील काशीविश्वेश्वर मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजन केले होते .

सातारा शहरा नजीकच्या खिंडीतील गणपती परिसरातील कुरणेश्वर मंदिर ,तसेच शहरा नजीकच्या संगम माहुली येथील काशी विश्वेश्वर मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी रात्री उशिरापर्यंत गर्दी केली होती .शहरातील गुरुवार पेठ कमानी हौद परिसरातील राजराजेश्वर मंदिर ,योगेश्वर मंदिर ,माची पेठेतील मुदगलेश्वर मंदिर येथे तसेच जिल्ह्यातील श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूर आणि सज्जनगड येथील समाधी मंदिरातही महाशिवरात्रीनिमित्त परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

सातारा शहरातील कृष्णा नगर परिसरातील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिरात पहाटेपासून शंकराच्या पिंडीला जलाभिषेक व पंचामृत अभिषेक घातल्यानंतर बिल्वपत्रे तसेच धोत्रेची फुले यांनी मंदिराला सुशोभत करण्यात आले होते .दिवसभर भक्तासाठी दर्शनासाठी भक्तांनी रांगा लावल्या होत्या.

रात्री उशिरा बारा वाजेपर्यंत मंदिरे दर्शनासाठी खुली ठेवण्यात आली होती महाशिवरात्रीच्या अवचित्य साधून नटराज मंदिरात लोककल्याण रोग निवारक, पापनाशक तसेच सुख, शांती व निरंतर धनधान्य, समृद्धी देणाऱ्या अशा रुद्र अनुष्ठानाचे ही आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती मंदिराचे व्यवस्थापकीय विश्वस्त रमेश शानभाग यांनी दिली. या तीन दिवशी रुद्र अनुष्ठानाची सांगता महाशिवरात्रीला दुपारी पूर्णाहुती ने करण्यात आली.

वेदमूर्ती दत्त शास्त्री जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली शहर परिसरातील वेदमूर्ती रोहित आपटे, ओमकार देशपांडे ,अविनाश वाळींबे ,वेदमूर्ती ज्योतिषाचार्य अनिरुद्ध शास्त्री गुमास्ते ,श्रेयस भिसे, पार्थ जोशी, आदित्य कुलकर्णी ,सागर पाटील ,प्रमोद कुलकर्णी, वेदांत देशमुख ब्रह्मवृंद तसेच उमामहेश्वर वेद पाठशाळेचे विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते .सकाळी एकादशी रुद्र, लघु रुद्र पूर्णाहुती होऊन मंगल आरती होऊन त्यानंतर अकरा कलश यात्रा मंदिर परिसरातून काढून श्री मूलनाथेश्वर पिंडीस महाअभिषेक घालण्यात आला. त्यानंतर नैवेद्य ,आरती होऊन प्रसाद वितरित करण्यात आला.

## लोकसेवक म्हणून काम करण्याची संधी द्या ; राजे समरजीतसिंह घाटगे

**मुरगुड :** राजे विक्रमसिंह घाटगे बँकेने एक हजार हून अधिक युवक-युवतींना व्यवसायांसाठी आजमितीस तब्बल ११२ कोटींचे कर्ज दिले आहे.या व्यवसायातून जवळपास साडेपाच हजार सर्वसामान्य लोकांना रोजगार मिळाला असून आमचा हेतू सार्थक ठरला आहे. समाज उभारणीचे हे काम आणखीन प्रभावशाली होण्यासाठी येत्या काळात आपला लोकसेवक म्हणून काम करण्याची संधी द्या असे आवाहन भाजपाचे नेते शाहू ग्रुपचे अध्यक्ष राजे समरजीतसिंह घाटगे यांनी केले.

निढोरी (ता.कागल) येथे आयोजित केलेल्या स्व.राजे विक्रमसिंह घाटगे यांच्या अमृतमहोत्सवी जयंतीनिमित्त विक्रमसिंह घाटगे फाउंडेशन व राजमाता जिजाऊ महिला समितीच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'समरजीतसिंह आपल्या दारी' उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



दरम्यान श्री.घाटगे यांनी या कार्यक्रमापूर्वी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ' मन की बात ' या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांच्या समवेत हजेरी लावली.

यावेळी बोलताना

घाटगे म्हणाले, शासनाच्या विविध योजनांचे पैसे लाभार्थ्यांच्या डायरेक्ट खात्यावर वर्ग करण्यासाठी आपण प्रयत्नशील असून आजपर्यंत या शासकीय योजनांच्या या आठ कॅम्प च्या माध्यमातून आठ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळाला आहे.येत्या विधानसभेपर्यंत हा आकडा वीस हजाराहून अधिक असेल असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना मुरगुड चे माजी उपनगराध्यक्ष दगडू शेणवी म्हणाले,ज्यांच्या दारात सकाळी सहा वाजता जाऊन उभे राहावे लागत होते त्या सर्वच उपेक्षितांना अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून राजे समरजीतसिंह घाटगे यांनी न्याय मिळवून दिला आहे.

यावेळी ग्रामस्थ व कर्मचाऱ्यांच्या वतीने राजे समरजीतसिंह घाटगे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कॅम्पमध्ये ४०३ नागरिकांनी नोंदणी केली.

यावेळी शाहू कारखान्याचे संचालक सचिन मगदूम, साताप्पा कळमकर, मारुती पाटील, सतीश कळमकर, अमर चौगुले, विलास मगदूम, विनोद पाटील, विठ्ठल मगदूम,सागर साठे,दिनकर भाकरे, हिंदुराव पाटील,वसंत तापेकर, दिगंबर अस्वले(उपसरपंच),

## राजाराम विद्यालय उपक्रमशील शाळा : डॉ अरविंद माने

**शिरोळ :** विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन हे उत्कृष्ट व्यासपीठ आहे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि शाळेच्या भौतिक प्रगती करिता विविध उपक्रम राजाराम विद्यालय नेहमीच राबविण्याचा प्रयत्न करत असल्याने या शाळेने उपक्रमशील शाळा अशी ओळख निर्माण केली आहे शाळेसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष डॉ अरविंद माने यांनी दिले

येथील राजाराम विद्यालय शिरोळ नं २ या शाळेचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलनाच्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून माजी नगरसेवक डॉ अरविंद माने हे बोलत होते तर समारंभाचे प्रमुख पाहुणे युवा उद्योजक अभिजीत माने माजी जिल्हा परिषद सदस्या सौ इंद्रायणी पाटील नगरपरिषदेचे कर प्रशासन अधिकारी म्हणून नुकतीच निवड झालेल्या प्रगती विजय पवार - चौगुले माजी ग्रामपंचायत सदस्या सौ शुभांगी फल्ले शिरोळ पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी दीपक कामत केंद्रप्रमुख अण्णा मुंडे यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शैक्षणिक साहित्य आणि महिला दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्या महिलांना प्रमाणपत्र व आकर्षक भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा व शाळेस स्वखर्चातून स्वागत कमान बांधून दिल्याबद्दल अध्यापिका श्रीमती सुनंदा पाटील यांचाही सत्कार करण्यात आला

या समारंभात सौ इंद्रायणी पाटील सौ शुभांगी फल्ले प्रगती पवार चौगुले अण्णा मुंडे दीपक कामत यांनी मनोगत व्यक्त करून वार्षिक स्नेहसंमेलनास शुभेच्छा दिल्या

यानंतर विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर आकर्षक नृत्य सादर केले विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारास उपस्थित आणि रोख रकमेची बक्षीस देऊन दाद दिली

या समारंभास शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सौ शितल जगदाळे सदस्या प्रियंका इंगळे सारिका सकट सदस्य रवींद्र पाटील मारुती जाधव गजानन सावंत दत्तात्रय पुजारी राहुल भोसले सुरेश गावडे सचिन सावंत शाळेतील शिक्षक सुनंदा पाटील त्रिशला येळगुडे मीनाक्षी हेगाण्णा यांच्यासह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते सूत्रसंचालन शिक्षक सनी सुतार यांनी केले स्वागत शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य व पत्रकार चंद्रकांत भाट यांनी तर शाळेच्या मुख्याध्यापिका

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.




# जलकार्य हे पवित्र देशकार्य : यशेंद्र क्षीरसागर

**कोरेगाव :** पाण्याच्या शुद्धतेचे आणि पुरवठ्याचे कार्य करणे, त्याविषयी स्वतःला वाहून घेणे हे खऱ्या अर्थाने देशकार्य आहे. शुद्ध आणि स्वच्छ पाणी हा जीवनाचा मूलभूत पवित्र मंत्र आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक, वक्ते ,सांख्यिकी विस्तार अधिकारी यशेंद्र क्षीरसागर यांनी केले. येथील पंचायत समितीमध्ये पाणी गुणवत्ता सनियंत्रण आणि सर्वेक्षण कार्यक्रम अंतर्गत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी ते विशेष निमंत्रित व्याख्याते म्हणून बीजभाषण करताना बोलत होते.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शंकर गांधीले, आरोग्य विस्तार अधिकारी विठ्ठल ओंबळेमन्सूर मुलानी,ग्रामसेवक, आरोग्यसेवक, आरोग्य सहाय्यक उपस्थित होते. श्री. क्षीरसागर म्हणाले, गुणवत्ता, देखरेख ,दुरुस्ती आणि सर्वेक्षण ही ही पाण्यासंदर्भातील महत्त्वाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. संत ज्ञानेश्वर ,संत तुकाराम यांच्या काळापासून शुद्ध, स्वच्छ पाण्याचे महत्व अधोरेखित होत आले आहे. पाणी गुणवत्तेसंदर्भात सर्वच घटकांनी आपली जबाबदारी ओळखावी. स्वच्छता आणि अशुद्ध पाण्याचे दुष्परिणाम याविषयी विषयी जनजागृती व्यापकतेने करावी. अशुद्ध पाण्यामुळे ७० टक्के रोग होतात.पाणीपुरवठा योजनेतील दोष आणि दुरुस्त्या याबाबत लोकसहभाग वाढवावा. जनजागृतीसंदर्भात संत गाडगेबाबा हे संपूर्ण जगाचे गुरु आहेत. त्यांचा आदर्श कायम समोर ठेवावा. पाण्याचे स्रोत शुद्ध.

# विकासकामांमुळे फलटण शहराच्या वैभवात भर पडेल : आमदार दीपक चव्हाण





**फलटण :** आमदार रामराजे नाईक निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आपण मागणी केलेल्या फलटण शहरातील विकास कामांसाठी शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून वीस कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. यातील बारा कोटी रुपयांच्या प्रशासकीय कामांना मंजुरीची मिळाली असून अन्य आठ कोटी रुपयांच्या कामानाही लवकरच प्रशासकीय मान्यता मिळेल. सदर वीस कोटींव्यतिरिक्त आणखीन तीस कोटी रुपयांचा निधीही लवकरच प्राप्त होणार आहे. या निधीच्या माध्यमातून जी विकास कामे होतील त्यामुळे फलटण शहराच्या वैभवात भर पडेल असे प्रतिपादन आमदार दीपक चव्हाण यांनी केले.

विधान परिषदेचे माजी सभापती आमदार रामराजे नाईक निंबाळकर यांच्या निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांची उपस्थिती होती.

सदर मंजूर झालेली कामे लवकरच प्रत्यक्षात सुरू होतील या कामांमध्ये गोळीबार मैदान व बारवबाग येथे पाण्याची उंच टाकी बांधणे व अनुषंगिक काम करणे यासाठी प्रत्येकी ७७ लाख, सुधारित जलकेंद्र ते गिरवी नाका मेनअरायझिंग ५० एचपी मोटर खरेदी करून बसविणे टप्पा एक याकरिता एक कोटी ९७ लाख रुपये व टप्पा दोन मधील सुधारित जलकेंद्र ते गिरवी नाका मेनअरायझिंग ५० एचपी मोटर खरेदी करून बसविणे सुधारित जलकेंद्र ते गिरवी नाका मेनअरायझिंग ५० एचपी मोटर खरेदी करून बसविणेसाठी बारा लाख रुपये, ब्राह्मण गल्ली येथील डीपी शिफ्ट करणे १८ लाख, वेलणकर दत्त मंदिर ते नेहरू चौक ते कॉलेज रोड दत्त मंदिर रस्ता करणे ४५ लाख अशा चार कोटी २६ लाखांच्या कामांचा समावेश आहे. तसेच सात कोटी ४१ लाख रुपयांच्या अन्य कामांमध्ये ३३ कामे आहेत. त्यात महतपुरा पेठेतील रस्ता काँक्रिटीकरण करणे ९१ लाख, पद्मावती अंतर्गत रस्ते खडीकरण, डांबरीकरण करणे एक कोटी १५ लाख, शनीनगर येथे नवीन संरक्षण भिंत बांधणेसाठी एक कोटी २८ लाख, साईबाबा कमान ते बर्गे गॅरेज रस्ता करणे २५ लाख, प्रभाग क्रमांक बारा मधील बोहरी मस्जिद ते मुक्ती अपार्टमेंट ते एल व्ही कदम घर चार इंची पाण्याची वितरण नलिका बसविणेसाठी २५ लाख अशा विविध कामांचा समावेश आहे.

या मंजूर झालेल्या वीस कोटींच्या कामा व्यतिरिक्त आणखी तीस कोटी रुपयांची कामे मंजुरीच्या मार्गावर आहेत व ती लवकरच मंजूर होतील व तो निधीही प्राप्त होईल, त्यामुळे फलटण शहराच्या विकासासाठी एकंदरीत ५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त होणार आहे. सदर निधी मंजूर केल्याबद्दल आमदार चव्हाण यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे फलटण तालुक्यातील जनतेच्यावतीने आभार व्यक्त केले.

माढा लोकसभा राष्ट्रवादीलाच मिळावा-संजीवराजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तीन आमदार आहेत व माढा लोकसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळायला हवा अशी बहुसंख्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची आग्रही मागणी व इच्छा आहे ही वस्तुस्थिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि त्या निर्णया बरोबरच आपण आता पुढे गेलो आहोत असे यावेळी संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी स्पष्ट केले. जर माढा लोकसभा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाला नाही तर तुम्ही कोणता निर्णय घेणार या प्रश्नावर बोलताना ते म्हणाले, आपण निर्णय घेतला आहे. अजितदादांना आपला नेता मानले आहे. त्यामुळे नेते ज्याप्रमाणे पुढील दिशा ठरवतील

# सातार्‍यात रविवारपासून पाणीकपात !

## पालिकेचा निर्णय : जुनी कपात रद्द; नवीन वेळापत्रक जाहीर

**सातारा :** नागरिकांना तीव्र पाणीटंचाईच्या झळा बसू नयेत, येणारा उन्हाळा सुसह्य जावा यासाठी सातारा पालिकेने कास व शहापूर योजनेच्या पाणीपुरवठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. पालिकेने तयार केलेल्या नवीन वेळापत्रकानुसार प्रत्येक पेठेचा पाणीपुरवठा आठवड्यातून एक दिवस बंद ठेवला जाणार असून, शहापूर योजनेच्या पाणीकपातीवर दि. १० तर कास योजनेच्या कपातीवर दि. ११ पासून अंमलबजावणी केली जाणार आहे.

शहरात गेल्या दोन महिन्यांपासून पाणीकपात सुरू आहे. दर मंगळवार व शनिवारी ही कपात केली जात आहे. कपातीचा हा जुना निर्णय रद्द करुन प्रशासनाने पाणीकपातीचे नवीन वेळापत्रक जाहीर केले असले तरी जलवाहिन्यांना लागणारी गळती, कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा, टँकरची उपलब्धता आदी अडचणींमुळे प्रशासनाला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे.

पेठा व पाणीकपातीचा वार

**कास :**

**सोमवार** - शुक्रवार पेठ, गडकर आळी परिसर

**मंगळवार** - बोगदा परिसर, पॉवर हाऊस, व्यंकटपुरा, धननीची बाग, करंडबी नाका, पोळ वस्ती, पॉवर हाऊस झोपडपट्टी, चिमणपुरा पेठ,

बुधवार : मनामती चौक, गुजर आळी, चिमणपुरा, ढोणे कॉलनी

**गुरुवार** - भटजी महाराज मठ परिसर, रामाचा गोट, गवंडी आळी, मंगळवार तळे, कोल्हटकर आळी, नागाचा पार, पद्मावती मंदिर परिसर, होलार समाज मंदिर परिसर, मंगळवार पेठ, ठक्कर कॉलनी, बोगदा ते समर्थ मंदिर, धस कॉलनी, दस्तगीरनगर

**शुक्रवार** - संत कबीर सोसायटी व पोळ वस्ती, पापाभाई पत्रेवाला चाळ, चिमणपुरा पेठ, गारेचा गणपती, मनामती चौक, नागाचा पार, पोळ वस्ती

**शनिवार** - शुक्रवार पेठ, प्रतापगंज पेठ, बुधवार नाका, नामदेव वाडी

**रविवार** - अदालत वाडा परिसर, माची पेठ, बोगदा परिसर, बोगदा ते बालाजी अपार्टमेंट परिसर, कांबळे वस्ती, जांभळे वाडा परिसर, बोगदा परिसर, जंगी वाडा, गोल मारुती, गोल मारुती ते राजवाडा लाईन

**शहापूर :**

**सोमवार** - मल्हार पेठ, बडेकर वस्ती, ढोर गल्ली परिसर, नकाशपुरा, सावकार गॅरेज, शनिवार पेठ परिसर, हॉटेल लॉयन पिछाडी ते टॅनिंग सेंटर, रविवार पेठ सर्वोदय कॉलनी, लोणार गल्ली, कैकाडी गल्ली ते मरिआई कॉम्प्लेक्स, जगताप कॉलनी, पंताचा गोट, खंडोबाचा माळ, वडार वस्ती ते बडेकर वस्ती व कांबळे वस्ती, ७६ मल्हारपेठ

**मंगळवार** - कुंभारवाडा, कोलाटी वस्ती, चार भिंती टाकी ते कूपर कारखाना अखेर

**बुधवार** - समर्थ मंदिर चौक ते हत्तीखाना, सोमवार पेठ, बागवान गल्ली, दैवज्ञ मंगल कार्यालय चौक ते न्यू इंग्लिश स्कूल कोपरा, जानकीबाई झंवर शाळा परिसर, खडकेश्वर शाळा परिसर, महात चौक, विष्णू आळी, रेणुका मंदिर परिसर, सोन्या मारुती चौक, बालविकास मंडळ परिसर, कूपर कारखाना ते पिसाळ आर्केड, शाहू गार्डन पिछाडी ते तरडे घर ते शिर्के हौद, पिसाळ आर्केड ओढ्यातील भाग, घोरपडे कॉलनी ते केसरकर पेठ, पार्टे घर, सूर्यवंशी वस्ती, जुना दवाखाना येथील काही भाग, गुरुवार पेठ जमदाडे घर ते शिर्के शाळा, शिर्के शाळा ते कमनी हौद पिछाडी, शिर्के शाळा ते पटवर्धन गॅरेज, शनिवार पेठ कल्पक सहवास अपार्टमेंट परिसर ते वाघाची नळी परिसर ते न्यू इंग्लिश स्कूल दगडी शाळा कोपरा ते खणआळी, लंबे बोळ परिसर.

**गुरुवार** - तांदूळ आळी, मोती चौक ते देवी चौक ते लक्ष्मी हॉटेल, गोरक्षण बोळ, शनी मारुती मंदिर पिछाडी परिसर, मोती चौक ते ५०१ पाटी ते औंधकर मळा, मोती चौक ते राधिका टॉकीज ते अमृता नर्सिंग होम अखेर परिसर.

**शुक्रवार** - समर्थ मंदिर परिसर, स्टेट बँक कॉलनी ते विश्वेश्वर मंदिर परिसर, मंगळवार पेठ.

**शनिवार** - करंजे, शेंडे कॉलनी, बाबर कॉलनी, एकता कॉलनी, निसर्ग कॉलनी, बुधवार नाका ते बारटक्के चौक.

**रविवार** - राजलक्ष्मी पिछाडी, शेटे चौक, नालबंद वाडा ते खड्डा मशीद कोतवाल वाडा, औंधकर घर पिछाडी, दत्त मंदिर ते कमानी हौद, राजसपुरा व दुर्गा पेठ

# होय आम्ही मतदान जनजागृती अभियान यशस्वी करणार

## गौरीशंकरच्या नारीशक्तीचा निर्धार


**लिंब :** भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी होय आम्ही मतदान जनजागृती करणार असा निर्धार गौरीशंकरच्या नारीशक्तीने केला आहे. ८ मार्च २०२४ जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने लिंब कॅम्पस मधील सर्व महिलांनी संघटित होऊन मी मतदान करणार व मतदानाचा हक्क प्राप्त समाज बांधवांनाही मतदान करण्यासाठी प्रवृत्त करणार हा या निमित्ताने महिलांनी संकल्प केला आहे. मतदान हा लोकशाही प्रणालीचा आत्मा आहे आपल्या राष्ट्राची प्रगती आणि विकासात्मकतेच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी भारतीय संविधान व लोकशाही अधिक बळकट होणे गरजेचे आहे त्यासाठी प्रत्येकाने मतदान प्रक्रियेत उस्फुर्त सहभाग नोंदवून नवप्रगतशील राष्ट्र घडवूया अशी शपथ व निर्धार आपण करूया असा संदेश महिलांनी दिला

गौरीशंकर नॉलेज सिटी लिंब मधील शंभर नारीशक्तींनी संघटित होऊन शासनाच्या मतदान जनजागृती अभियानाला प्रतिसाद देत होय आम्ही नवमतदार बरोबरच मतदान चळवळ व्यापक करून मतदानाचा टक्का वाढविण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी मतदानाचे महत्त्व व उपयुक्तता याबाबत समाज प्रबोधन व जनजागृतीचा निर्धार केला आहे .एक राष्ट्र एक ध्येय नवरराष्ट्र उभारण्याचा एक संकल्प हे ध्येय ठेवून सर्व समाज घटकापर्यंत हा संदेश आम्ही पोहोचवणार आहोत.

या उपक्रमाचे अध्यक्ष मदनराव जगताप, उपाध्यक्ष मिलिंद जगताप, संचालक डॉ.अनिरुद्ध जगताप, जयवंतराव साळुंखे ,आप्पा राजगे, प्रशासकीय अधिकारी नितीन मुङलगीकर, जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर या सर्वांनी नारीशक्तीच्या उपक्रमाचे कौतुक केले.



# वडूज पोलिसांकडून बेशिस्त वाहनधारकावर कारवाईचा धड़ाका....!



**वडूज शहरात रात्रीच्या सुमारास अस्तव्यस्त लावलेल्या वाहनावर कारवाई करताना वाहतूक पोलीस कर्मचारी**

**नियम मोडणाऱ्या वर कडक कारवाई करणार**

**शाळा महाविद्यालय सुरु झाल्याने वडूज बसस्थानकावर व परिसरात फिरत अल्पवयीन मुलांसह टवाळक्या करणाऱ्या मुलांचे प्रमाण वाढत होते. तर या कारवाई मुळे असा प्रकार करणाऱ्यांच्या चांगल्याच मुसक्या आवळल्या आहेत. यामुळे सड़कसख्याहरीना पण चांगला चाप बसला आहे. आणि जर कोणी वाहतुकीचा नियम मोडला तर त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.**

**- अजय भोसले**
**वाहतूक पोलीस कर्मचारी वडूज.**

**समन्वय साधून अनेक समस्या मार्गी लावणार....**

**वडूज पोलीस ठाण्याच्या माध्यमातून बांधकाम विभाग, नगरपंचायत यांच्यात बैठक् घेऊन परिसरातील वाहतूक व्यवस्थेत अजून काय बदल करता येतील का याबाबत समन्व्य साधनार आहोत. लहान मुले, वयोवृद्ध व्यक्तींना रस्त्यावरून ये जा करत असताना काही दुचाकींचा वेग जास्त असतो आणी यामुळे अपघात घडतात तर त्यासाठी दुचाकी वाहन धारकांवर कडक कारवाई केली जाणार आहे.**

**- घनश्याम सोनवणे**
**पोलीस निरीक्षक वडूज.**

**वडूज :** येथील वडूज पोलिसांकडून आज धूम स्टाईल, ट्रिपलसीट, लायसन्स तपासणी मोहीम हाती घेतल्याने युवकांनी चांगलाच धसका घेतल्याचे दिसून आले तर आज झालेल्या या अचानक कारवाईमुळे वाहन चालकांची धांधल उडाली.

तालुक्याची राजधानी म्हणून वडूज ला ओळखले जाते. आणि याच राजधानी मध्ये शासकीय निमशासकीय कार्यालय, शाळा महाविद्यालय असुन शहरात खेड्यापाड्यातून कामानिमित्त व शिक्षणासाठी येणाऱ्या नागरिकांची व विद्यार्थी विद्यार्थिनींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे . तर बसस्थानक व परिसरात गेल्या काही दिवसांपासून दुचाकीवरून धूमस्टाईल ने गाडी चालवत दंगा करणाऱ्यांची संख्या जास्त होती तसेच ट्रीपल सिट , विना परवाना गाडी चालवणे , फॅन्सी नंबर प्लेट, अश्या प्रकरणात जास्त वाढ झाली होती. तर अशा वाहनधारकावर वाहतूक शाखेचे कर्मचारी अजय भोसले, श्री वाघमारे यांनी चौकाचौकात दंडात्मक कारवाई चा धडाका लावला आहे. काही दिवसांपासून वडूज बसस्थानकावर पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेने चांगलाच दबदबा बसवून कारवाईला सुरवात केलीत्यामुळे अशा प्रकारांना आळा बसल्याने दुचाकी रायडर्स चांगलेच धास्तावले आहेत.


त्याचबरोबर शहरातील पार्किंग व्यवस्थेच नियोजन नसल्याने आठवडा बाजाराच्या दिवशी मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी होत होती. यामुळे काही वेळा किरकोळ बाचाबाची झाली होती. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन आता तरी वडूजच्या पोलिसांनी वाहतूक व्यवस्था सुरळीत केल्याचे चित्र आहे. तर आज एल ए डी बल्प बसवलेल्या वाहन धारकांना जागेवरच बल्प काढण्यास सांगितले. तर या मोहिमेत होमगार्ड महादेव सकट, व इतर होमगार्ड सहभागी झाले होते.

# शिखर शिंगणापुरच्या डोंगरावरील परिसर हर हर महादेवच्या जयघोषाणे दुमदुमला

**दहिवडी :** संपूर्ण महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या माण तालुक्यातील शिखर शिंगणापूरच्या महादेव डोंगरावर आज हर हर महादेवचा जयघोष झाला,अन संपुर्ण महादेव डोंगर या जयघोषाने दुमदुमला .आज महाशिवरात्रीनिमित्त लाखो भाविक आले त्यांनी शिव पार्वतीचे मनोभावें दर्शन घेतले. महाशिवरात्री मानाची महापूजा ज्ञानेश्वर बडवे यांच्या हस्ते करण्यात आली.

महाशिवरात्री निमित्त भाविकांच्या अलोट गर्दीत शुक्रवार पहाटे ३ पासून भाविकानंसाठी मंदिर खुले करण्यात आले होते. मानकरी, सालकरी यांचे वतीने महाशिवरात्री निमित्त मुख्य शंभू महादेव मंदिरात सजावट करण्यात आली होती तर फुलमाळा व तोरणाची सजावट विशेष आकर्षण ठरत होते. रात्री १२ वाजता सालकरी मानकरी यांच्या उपस्थितीत महापूजा व बेलार्पण सोहळा संपन्न झाला. हरहर महादेव गर्जनेने शंभू महादेव मंदिर परिसर यावेळी दणाणून गेला होता.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने



संपूर्ण मंदिरास फुलमालांचे तोरण बांधण्यात आले तर मंदिर दगडी खांबास बेल फुल माळांची सजावट करण्यात आली होती.

प्रतिवर्षी प्रमाणे महापूजा म्हणजे मुख्यशिवपिंडीच्या त्रिकाल प्रहरपूजा करण्यात आल्या . मध्यानरात्री १२ ते १,१५ मंगलपर्व काळी महाशिवरात्री महापूजा करण्यात आली. यावेळी पंचक्रोशीसह राज्यातील कानाकोपऱ्यातून शिवभक्तांनी गर्दी केली होती हरहर महादेव गर्जनेत मध्यानरात्र महापूजा संपन्न झाली

महाशिवरात्री निमित्त गेले सप्ताहभर इथे विविध धार्मिक कार्यक्रम सुरु होते. माघ कृष्ण नवमीच्यां महान्यास पूजेने महाशिवरात्री प्रयोजनास प्रारंभ झाला होता. गेले सप्ताहभर शिवकथा, महान्यास पूजेबरोबर शिंगणापूर येथे महाशिवरात्री उत्साहात साजरी झाली.तर महाशिवरात्री निमित्त हजारो भाविकभक्तांनी घेतला शिवलिंग दर्शनाचा लाभ झाला.

छत्रपती उदयनराजे भोसले व राजमाता कल्पनाराजे भोसले यांचे वतीने समस्त सेवाधारी मानकरी यांचे माध्यमातून महापूजा करण्यात आल्या. ॐ नमः शिवाय जप, शिवलीलामृत ग्रंथ, ज्ञानेश्वरी सप्ताह वाचन, भजन पूजन,असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. शिवभक्तांसाठी महाशिवरात्रीस रात्रभर मंदिर खुले ठेवण्यात आले होते. गुरुवारी उत्तर रात्री पासूनच भविक यात्रेकरूनीं मंदिरा सभोवती देवदर्शन, अभिषेकासाठी रांगा लावल्या होत्या. समस्त थदाळकर बडवे सालकरी यांनी महाशिवरात्री प्रयोजन कार्यक्रमाचे नियोजन केले होते. सर्वच मानकरी,सेवाधारी यांचे वतीने शंभू महादेव चरणी सप्ताहभर सेवा अर्पण करण्यात आली.

सातारा, वडूज, दहिवडी, फलटण एसटी प्रशासनाने ज्यादा बसेसची सोय केली होती तर सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे व सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. उमाबनामध्ये वाहनतळ केल्याने शंभू महादेव मंदिर परिसरामध्ये वाहनांची कोंडी झाली नाही. दरम्यान दिवसभर मुख्यप्रशासकीय अधिकारी,लोकनेते, विविध संस्थाचे पदाधिकारी, यांनी महाशिवरात्री निमित्त शिवपिंडीचे दर्शन घेतले इतर भविकभक्तांना सुमारे दोन ते तीन तास देवदर्शन अभिषेकास लागत होते. उत्साही वातावरणात महाशिवरात्री महोत्सव पार पडला मंदिर परिसरातही पोलीस बंदोबस्त असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

# आचारसंहितेच्या लगबगीमुळे प्रशासकीय सभेत २४८ विषयांना मंजुरी

**सातारा :** लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता लागण्याच्या शक्यतेने सातारा पालिकेच्या प्रशासकीय सभेत गुरुवारी तब्बल २४८ विषयांना हिरवा कंदील देण्यात आला . मुख्याधिकारी अभिजीत बापट यांच्या अध्यक्षतेखाली दोन तास झालेल्या सभेमध्ये सर्व विषयांना विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत मंजुरी देण्यात आली विषय पत्रिकेवर पायाभूत सुविधांच्या कामांना प्राधान्य देण्यात आले होते विशेषता पायाभूत सुविधांची तब्बल अंदाजे तीन कोटी रुपयांची कामे मार्गस्थ करण्यात आल्याची माहिती आहे

सुमारे तीन महिने सातारा पालिकेची प्रशासकीय सभा झालेली नव्हती त्यामुळे प्रशासकीय मंजूरी आणि इतर काही विकास कामांच्या निविदा या दृष्टीने आगामी सभा कधी होणार याकडे लक्ष लागून राहिले होते मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता केव्हाही लागू शकते या दृष्टीने सातारा पालिकेने मुख्याधिकारी अभिजीत बापट यांच्या संमतीने प्रशासकीय सभेचे आयोजन केले होते येथील कमिटी हॉलमध्ये गुरुवारी सकाळी ११ वाजता सभेला सुरुवात झाली विषय पत्रिकेचे वाचन सभासचिव अतुल दिसले यांनी केले यावेळी उपमुख्याधिकारी अरविंद दामले तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते

शिवतीर्थ स्मारकाचे पूर्णत्व,सोनगाव कचरा डेपोमध्ये मियावाकी फॉरेस्ट, कास येथे संरक्षक भिंत कास धरण सांडवा येथील अर्धवट अवस्थेतील रीटेनिंग बॉलचे काम पूर्ण करणे, नळ कनेक्शन च्या संदर्भातील खोदकामाच्या पूर्ण परवानगी घेणे, सातारा शहरांमध्ये वाहतूक नियमानासाठी ट्रॅफिक वॉर्डन नेमणे स्वच्छ भारत अभियान दोन अंतर्गत शहर स्वच्छता कृती आराखड्यास मंजुरी देणे, महादरे तलाव येथे दहा एचपी ची नवीन मोटार बसवणे, तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने झालेल्या विविध खर्चांना कार्योत्तर मंजुरी देण्यात आली हद्द वाढीच्या भागांमध्ये पायाभूत सुविधांची कामे मार्गस्थ करण्यात येऊन ज्या ज्या ठिकाणी रस्ते गटारे मंजूर करण्यात आलेले आहेत त्या त्या ठिकाणी वीज खांब उभे करून दिवाबत्तीची सोय करणे अशा तब्बल तीन कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आल्याचे वृत्त आहे

# मुख्यमंत्री 'माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात वडोली निळेश्वरचे निळेश्वर विद्यालय सातारा जिल्ह्यात अव्वल



**निळेश्वर विद्यालय हे गुणवत्तेतही अग्रेसर राहिले असून शिष्यवृत्ती परीक्षा, मंथन परीक्षेतही या शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता यादीत असतात. शासनाच्या या स्पर्धेमुळे शाळांमध्ये स्वच्छता व भौतिक सुविधांमध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत. शाळेतील वातावरणही प्रसन्न राहते. या स्पर्धेतील सर्व निकषामध्ये शाळेने बाजी मारली. शिक्षक व विद्यार्थ्यांनी यासाठी परिश्रम घेतले.**

**मसूर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात ज्ञानप्रसारक शिक्षण संस्थेचे निळेश्वर माध्यमिक विद्यालय वडोली निळेश्वर ता कराड या विद्यालयाने सातारा जिल्ह्यात अव्वल स्थान पटकाविले आहे. राज्य शासनाने संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांसाठी ही स्पर्धा आयोजित केली होती.

सदर विद्यालयाने सर्वप्रथम केंद्रस्तर, तालुकास्तर अशी बाजी मारत अखेर सातारा जिल्हयामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. स्पर्धेकरीता निर्धारीत सर्व तीस निकषांमध्ये विद्यालायाला संपुर्ण जिल्ह्यात उत्कृष्ठ गुण मिळाले. विद्यालयात वर्षभर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले. शालेय गुणवत्तेतही विद्यालय सदैव अग्रेसर असते. अशी माहीती मुख्याध्यापक सचिन नलवडे यांनी दिली. जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष म्हणून काम पहात असतानाच शाळेची प्रगती ही उत्तरोत्तर वाढत राहण्याकरीता सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सदैव प्रयत्नशील राहिल्याने हे सामुहिकपणे यश मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सातारचे इंग्रजी माध्यमाचे गुरुकुल विद्यालय विभागस्तरावर निवडले गेले आहे. जिल्हयात प्रथम निळेश्वर माध्यमिक विद्यालय वडोली निळेश्वर. द्वितीय क्रमांक सौ. सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा पाटण. तृतीय क्रमांक मुधाईदेवी विद्यामंदीर देऊर, ता. कोरेगांव यांना मिळाला आहे.

विद्यालयाच्या या यशाबद्दल ज्ञानप्रसारक संस्थेचे अध्यक्ष सुरेश संकपाळ, सचिव तुकाराम नांदुगडे, संस्थेचे संचालक, पालक ग्रामस्थ यांनी मुख्याध्यापक सचिन नलवडे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांचे अभिनंदन केले आहे.

शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रति उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी. त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी, प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी भौतिक सुविधांचे निर्माण, शैक्षणिक गुणवत्तेतील वाढ व प्रशासकीय सुधारणा अशी प्रमुख क्षेत्रे सदर योजनेसाठी निश्चित करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत ४७८ शाळांचा समावेश असलेला सदर योजनेचा पहिला टप्पा कार्यान्वित आहे. योजना शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी राबविण्यात येते. त्या प्रमाणात प्राधान्य दिल्यास शाळेचा सर्वांगीण विकास निश्चितपणे होऊ शकतो. यासाठी हे अभियान राबवण्यात आले.

# मुनावळे येथील वॉटर पार्क श्रेय सन्माननीय आमदार शिवेंद्रराजे भोसले यांचेच : ज्ञानदेव रांजणे

**सातारा** : सातारा- जावली चे भाजपचे कार्यसम्राट आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सातारा जावली विधानसभा मतदारसंघाच्या विकास कामासाठी अहोरात्र परिश्रम घेतलेले आहेत. अनेक विकास कामे गतीने होत असून आज होणाऱ्या मुनावळे येथील वाटर पार्कच्या पायाभरणी ही आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनीच केली आहे . त्यांच्या उपस्थितीत भूमिपूजन होत आहे.

याचा आनंद वाटत असल्याची माहिती सातारचे युवा नेते राजू भोसले व जावलीचे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक ज्ञानेश्वर रांजणे व भिकुभाऊ भोसले यांनी सातारा येथे झालेल्या भरगच्च पत्रकार परिषदेत दिली.

कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या अनेकांना आपलं गाव, शिवार व घरदार जमीन जुमला सोडून दुसऱ्या ठिकाणी पुनर्वसन व्हावे लागलेले आहे. परंतु, ज्यांनी आपल्या मातृभूमी मध्ये थांबून या भागातील निसर्ग व नैसर्गिक साधन सामग्री जपली आहे. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी पर्यटन वाढीच्या दृष्टीने आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. एवढेच नव्हे तर कोविड काळातही त्यांनी या दुर्गम भागामध्ये दिलासा देण्याचे काम केले. या या दुर्गम भागाला वाटर पार्क व इतर सुविधांमुळे खूप मोठे महत्त्व प्राप्त झालेले आहे.

परंतु स्थानिक भूमिपुत्रांसाठी रोजगार उपलब्ध नव्हता. याची जाणीव ठेवून उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व मान्यवर नेते तसेच आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पर्यटन वाढीसाठी पुणे मुंबई व इतर ठिकाणच्या धर्तीवर मुनावळे तापोळा बामणोली या ठिकाणी पर्यटन वाढीसाठी वॉटर स्पोर्ट्स निर्माण करणे गरजेचे आहे. अशी महत्वपूर्ण मागणी अनेकदा केली होती. एवढेच नव्हे तर मंत्रालय पातळीवर बैठकी घेण्यात आलेली आहे. या बैठकीचे सर्व कागदपत्र पर्यटन विभाग व महसूल विभागाकडे उपलब्ध आहे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुनावळे या ठिकाणी वॉटर स्पोर्ट्स उभारणी केली जात आहे.

या सर्व कामाचे खरं म्हणजे श्रेय हे फक्त आणि फक्त आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचेच आहे. याची माहिती जनतेला व्हावी. यासाठी आज तातडीने पत्रकार परिषद घेऊन माहिती देण्यात आली. या वेळेला स्थानिक भूमिपुत्र व ग्रामस्थ निलेश भोसले, पांडुरंग भोसले, रमेश भोसले, तात्याबा भोसले, संदीप जांभळे, विलास चव्हाण, किरण भोसले उपस्थित होते ज्यांनी काम केलेले आहे त्यांना कामाचे श्रेय देणे ही जावली तालुक्याची संस्कृती आहे. आमदार भोसले यांनी केलेल्या प्रयत्नाबद्दल स्थानिक ग्रामस्थ व मान्यवरांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# मुंढवा केशवनगर चौकातील भुयारी मार्गासाठी पाच कोटीं निधीची तरतूद

## शिवसेना शहरप्रमुख नाना भानगिरे यांनी केलेल्या लढ्याला यश

**हडपसर** : हडपसर मुंढवा केशवनगर भागातील रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी, वाहनांच्या लांबच लांब रांगा, इंधनाचा अपव्यव, प्रचंड मनस्ताप हा रोजच्या अनुभव मुंढवा केशवनगर चौकात वाहन चालकांना अनुभवायला येत आहे, नागरिकांच्या समस्यांची दखल घेऊन शिवसेना शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी केलेल्या रास्ता रोको आंदोलनाची पुणे महापालिकेला दखल घेणे भाग पडले.

मुंढवा - केशवनगर चौकात भुयारी मार्गासाठी पाच कोटी रुपयांची निधी तरतूद झाली असल्याने शिवसेनेच्या आंदोलनाला यश आले आहे.

मुंढवा - केशवनगर चौकात सततच्या वाहतूककोंडीमुळे नागरिक व वाहनचालक प्रचंड प्रमाणावर हैराण झाले होते, तासनतास वाहनांच्या रांगा लागत असल्याने इंधनाचा मोठ्या प्रमाणात अपव्यव होतो, येथील नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन शिवसेना शहरप्रमुख माजी नगरसेवक प्रमोद नाना भानगिरे यांनी १५ डिसेंबर रास्ता रोको आंदोलन केले व प्रशासनाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला, अनेक वर्षांपासून हा प्रश्न रखडला असताना राजकारण्यांनी व प्रशासनाने दुर्लक्ष केले होते, भानगिरे यांनी तातडीने आंदोलन केल्याने महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी येथील भुयारी मार्गासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद केली.



उपनगर झपाट्याने वाढत असताना पालिकेत समाविष्ट नव्या गावांचे नागरी प्रश्न प्रलंबित आहेत, महापालिकेत प्रशासक असल्याने सर्व नगरसेवक माजी झाले आहेत, त्यामुळे दाद कोणाकडे मागायची परंतु राजकीय मतभेद बाजूला ठेऊन नाना भानगिरे यांनी हडपसर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला आहे.

# जयाभाऊ... दिवस आणि वेळ सांगा

## विकासाच्या मुद्द्यावर होवू द्या आमने सामने! पाणी संघर्ष समितीचं आ.जयकुमार गोरेंना प्रति आव्हान



**वडूज** : गेली १४ वर्षे आपण माण खटावचे आमदार आहात. फक्त पाणी प्रश्नावर आज अखेर तुम्ही राजकारण केलं आहे. ज्या येरळवाडी धरणावर वडूज सह ८ गावं शेती व पिण्याच्या पाण्या संदर्भात अवलंबून आहेत. ते येरळवाडी धरण आजअखेर कोणत्या योजनेत घातलं आहे का? तर येरळा नदीमध्ये पाणी सोडण्यासाठी कायमस्वरूपी कोणत्या योजनेचा लाभ मिळणार हेही आपण सांगावं. खटाव तालुक्यातील अनेक प्रश्नांवर जाब विचारण्यासाठी तुम्ही दिवस, वेळ आणि ठिकाण ही सांगा आम्ही आमने सामने यायला तयार असल्याचं प्रति आव्हान खटाव तालुका संघर्ष समितीच्या वतीने आमदार जयकुमार गोरे यांना देण्यात आलं.

खटाव तालुका पाणी संघर्ष समितीच्या वतीने सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या वतीने वडूज ता खटाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत हे प्रति आव्हान देण्यात आलं.

तर प्रत्येक वेळी मी पाणी आणले, मी पाणी आणले असं ओरडून सांगणारे लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक असून कोणत्याही पाणी योजनेचे मालक नाहीत, तालुक्यातील जनतेच्या विविध प्रश्नांवर आंदोलन केलं तर आंदोलन कर्त्यांवर वैयक्तिक पातळीवर आरोप करतात. तुमच्या निष्क्रियतेमुळेच वारंवार आंदोलन करावे लागत असल्याची टिप्पणी खटाव तालुका पाणी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी केली.

यावेळी राष्ट्रीय काँग्रेसचे रणजितसिंह देशमुख,

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अनिल पवार, मार्केट कमिटी उपाध्यक्ष विजय शिंदे, राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष मकरंद बोडके, माजी सभापती संदीप मांडवे,रासप जिल्हा अध्यक्ष श्रीकांत देवकर,डॉ. महेश गुरव, डॉ. महेश माने, तानाजी देशमुख, दत्तूकाका घार्गे, तुषार बैले,राष्ट्रीय काँग्रेस युवक जिल्हा अध्यक्ष अमरजीत कांबळे, तानाजी वायदंडे,

सूर्यभान जाधव, शरद खाडे, शहाजीराजे गोडसे, धनंजय काळे, गणेश भोसले, संदीप गोडसे, इम्रान बागवान, जयवंत खराडे आदींची उपस्थिती होती.

# शिवपुत्र संभाजी महाराजांचा हडपसरनगरीत अवतरणार इतिहास

## समस्त पुणेकरांसाठी महानाट्याचे मोफत आयोजन

**हडपसर** : स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास मराठी माणसांच्या मनामनात रुजवणारे खासदार डॉ.अमोल कोल्हे यांचा शिवपुत्र संभाजी हे महानाट्य दिनांक ९, १० व ११ मार्च रोजी हडपसर मुंढवा रेल्वे पुलाजवळील मैदानात आयोजित करण्यात आले आहे.

संसदरत्न खासदार डॉ.अमोल कोल्हे हे शिवपुत्र संभाजी महाराजांच्या भूमिकेतून एक अनोखा शौर्यपट आपल्यासमोर उलगडणार आहेत. शौर्याचा, समर्पणाचा, स्वराज्य भक्तीचा हा थरार अनुभवायची सुवर्णसंधी या निमित्ताने तमाम पुणेकरांसाठी उपलब्ध झाली आहे. पुणेकरांसाठी या महानाट्याचे मोफत आयोजन करण्यात आले असून सर्वांनी स्वराज्याचा जाज्वल्य इतिहास याची देही, याची डोळा अनुभवण्यासाठी यावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

भोसरी व अहमदनगर येथे महानाट्यास लाभलेला प्रचंड प्रतिसाद पाहता हडपसर येथेही प्रेक्षकांच्या आसन व्यवस्थेची व पार्किंगची प्रशस्त व्यवस्था करण्यात आली आहे. अशी माहिती नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली.



**मोफत पास खालील पत्त्यावर उपलब्ध**

**१ - राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) भवन, डेंगळे पुलाजवळ, शिवाजीनगर**

**२- प्रशांत सुदामराव जगताप यांचे जनसंपर्क कार्यालय**

**जगताप चौक, वानवडी, पुणे -४०**

## खेड मध्ये शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण सुरु

**राजगुरूनगर** : खेड तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण उत्साहात सुरू झाले आहे. डायट पुणे ,जिल्हा परिषद पुणे , पंचायत समिती खेड , संयुक्त विद्यमाने खेड तालुक्यात शिक्षक वृद्ध क्षमता प्रशिक्षण नव सह्याद्री अध्यापक विद्यालय चाकण येथे टप्पा क्रम१ चे प्रशिक्षण दिनांक ४/३/२०२४ ६/३/२४ या कालावधीत संपन्न झाले झालेआहे . प्रशिक्षणाचे एकूण तिन टप्यात होणार आहे.

सदर प्रशिक्षणासाठी इयत्ता नववी ते बारावीला अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण होणार आहे सदर प्रशिक्षणाचे उद्घाटन गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती खेडचे अमोल जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे सदर प्रशिक्षणातील खेड तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व आश्रम शाळेतील जवळपास एकूण ५९२ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे

# नव्या समाविष्ट गावांच्या रस्ते विकासासाठी दहा कोटींची तरतूद : आमदार संजय जगताप

## निवृत्ती अण्णा बांदल यांच्या विशेष पाठपुराव्याला यश

**हडपसर** : संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार संजय जगताप यांच्या सूचनेवरून पुणे महानगरपालिकेच्या वतीने मंजूर करण्यात आलेल्या सुमारे दहा कोटी रुपयांच्या रस्ते विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे लवकरच उंड्रीतील विविध विकास कामे मार्गी लागतील , उंड्रीतील चौकात कामांचा शुभारंभ पार पडला.यावेळी आमदार जगताप बोलत होते.

सातव संस्कृती स्कूल जवळ पूल एक कोटी पंधरा लाख, जगदंबा भवन कडे जाणारा शिव रस्ता सहा कोटी, आंबेकर हॉटेल समोरील ऑर्चिड स्कूल कडे जाणारा रस्ता ६० लक्ष, बिशप स्कूल ते संस्कृती स्कूल कडे जाणारा रस्ता एक कोटी २० लक्ष या विकास कामांचा शुभारंभ आमदार संजय जगताप यांच्या हस्ते उंड्री चौकात करण्यात आला.



यावेळी पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य माजी सरपंच निवृत्ती अण्णा बांदल, माजी उपसभापती सचिन घुले, माजी सरपंच संजय जाधव, संदीप बांदल, सुभाष बापू थिटे, नितीन सुभाष घुले, देवानंद मासाळ, महिला आघाडी प्राजक्ता पेठकर, आबासाहेब दगडे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येथील प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विद्यालय जगदंब भवन रस्त्याच्या भूमिपूजन प्रसंगी दशरथ भागवत, शितल दीदी, अश्विनी दीदी, दत्ता भाई, तेजस्विनी गोळे, सेंटरचे अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पुणे महापालिकेत समाविष्ट गावांमध्ये अनेक नागरी सुविधा प्रलंबित आहेत या भागासाठी महापालिकेकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळणे अपेक्षित आहे खासदार सुप्रियाताई सुळे व मी पाठपुरावा करून मोठ्या प्रमाणात निधी आणण्याचा प्रयत्न करत आहोत येथील भागाचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने आम्ही कार्यरत आहोत, असे सांगून आमदार संजय जगताप म्हणाले, लोकसभा निवडणूक होत आहे ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर व्हावी भावनिक न होता सुप्रियाताई यांनी त्यांच्या खासदारकीच्या काळात मोठ्या प्रमाणात कामे केली व संसद रत्न पुरस्कार देखील मिळवले आहेत त्यामुळे त्यांना पुन्हा खासदार होण्याची संधी मतदारांनी द्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

बारामती लोकसभा मतदारसंघातील पुरंदर हवेली भागात पवार साहेबांना मानणारा मोठा वर्ग असून सुप्रियाताई यांनी केलेली विकास कामे व दांडगा जनसंपर्क यामुळे तुतारी फुंकणारा माणूस घराघरात पोहोचवण्यासाठी आम्ही काम करत आहोत, पुन्हा सुप्रियाताईच निवडून येतील असा विश्वास पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य निवृत्ती अण्णा बांदल यांनी व्यक्त केला.

महापालिकेतून या गावांसाठी निधी मिळावा म्हणून निवृत्ती अण्णा बांधील आणि सचिन घुले यांनी पाठपुरावा केला होता.

महाशिवरात्री निमित्त प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयच्या वतीने साकारलेल्या रामेश्वरम मंदिराचे उदघाटन यावेळी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

# जागतिक महिला दिनानिमित्त डीसीएम सोसायटीमध्ये महिलांची मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**हडपसर / पुणे** : जागतिक महिला दिनानिमित्त नाना पेठ येथील अहिल्या आश्रम मध्ये डीसीएम सोसायटी ऑफ इंडियाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे कला महाविद्यालयामध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनीच्या मातांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते .

या शिबिरामध्ये रक्तगट तपासणी. हिमोग्लोबिन तपासणी. रक्तातील साखर तपासणी. ब्लड प्रेशर तपासणी. उंची व वजन तपासणी आदीं शारीरिक मोफत आरोग्य तपासणी शिबीरात करण्यात आली. या आरोग्य शिबिरासाठी सुगत क्लिनिक मधील डॉ कपिल जगताप,डॉ समीर मोमीन,डॉ राजेंद्र शिंदे, डॉ मीनहाज हसन आदींचे सहकार्य लाभले या शिबिरामध्ये सुमारे जवळपास २०० महिलांची तपासणी करण्यात आली .



यावेळी या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डीसीएम सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डी.टी रजपूत सर. संस्थेचे जनरल सेक्रेटरी विशाल शेवाळे,खजिनदार सिद्धार्थ शेवाळे, मुख्याध्यापिका शिल्पाताई भोसले, संस्थेचे प्रतिनिधी वर्षाताई पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारती सहस्त्रबुद्धे,उपप्रचार्य डॉ नरेश पोटे, डॉ जे.के म्हस्के,डॉ तेजपाल कांबळे, डॉ प्रवीण कांबळे,प्रा रणजीत देशमुख,प्रसाद कर्डिले,डॉ नरेश शिशुपाल,डॉ राजकुमार गांधीले,प्रा पंकज जगताप,प्रा. प्रीती वठरकर, किशोर भुजबळ,डॉ.जयश्री कांबळे. आदि यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ रूपाली भागवत यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा .प्रणाली भोसले यांनी मानले

## ससाणेनगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पर्यायी रस्ते चालू करण्याची नागरीकांची मागणी

**हडपसर** : हडपसर ससाणेनगर मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पर्यायी रस्ते चालू करा अशी मागणी ससाणेनगर भागातील नागरीकांनी केली.मनपा आयुक्त यांना वरील विषयाचे निवेदन या भागातील आधार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महेश ससाणे यांनी दिले.

हडपसर ससाणेनगर मुख्य रस्त्यावर वारंवार होणारी वाहतूककोंडी सोडवण्यासाठी अर्धवट स्थितीमध्ये केलेले पर्यायी रस्ते लवकरात लवकर मनपाने पूर्ण करून वाहतूकीसाठी खुले करावे, ससाणेनगर भागामध्ये गेले अनेक दिवस पिण्याची पाईपलाईन जोडण्याचे काम मुख्य रस्त्यावर सुरू आहे. त्यामुळे वारंवार रस्त्यावर वाहतूककोंडी होत आहे. वाहनचालकांना वाहन चालवणे जिकिरीचे होत आहे. त्यातच शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहे,वाहतूककोंडीमुळे त्यांना परीक्षांनाही उशीर होत असतो. तसेच वृद्ध नागरिक,कामगारवर्ग,

अधिकारीवर्ग व महिलांनाही वाहतूककोंडीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.अनेक बेशिस्त वाहनचालक आपली वाहने रस्त्यावरच उभी करत असल्याने तसेच अनेक अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या हातगाड्याही रस्त्यावरच त्यांच्या मालाची विक्री करत उभ्या असतात. त्यांच्यावर कडक कारवाई न होता अतिक्रमण कारवाईचा केवळ फार्सच दाखवला जातो.तसेच अनेक बेशिस्त रिक्षाचालक प्रवासी घेताना व उतरवताना रस्त्यामध्येच कोठेही रिक्षा उभ्या करून प्रवासी घेत व उतरवत असतात त्याकडेही वाहतूक विभागाचे दुर्लक्ष आहे.